# “यशवंतराव चव्हाण : ध्येयवादी संरक्षणमंत्री”

**डॉ. संजय गोरे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदुर, जि. चंद्रपुर ४४२९०८ मोबाईल क्र. ९२२६११६५४० Email idsanjaygore.1462@rediffmail.com

---

**सारांश**

स्वातंत्र भावनेचा कसा प्रसार होईल व विविध माणसांची जुळवण करून संघटना कशी बळकट होईल. राष्ट्रउभारणीत सर्व विचारांचे योगदान राहील या उदात्त हेतूने यशवंतरावांनी राष्ट्रीय चळवळीत सहभाग घेतला. यशवंतरावांच्या विचार सृष्टीवर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा पगडा होता. यशवंतराव चव्हाण खरे लोकनेते होते. राजकारणातील सुसंस्कृतपणा त्यांच्यात अनेकदा दिसून आला. घटनेच्या तत्वांचे संरक्षक व लोकशाहीचा पुरस्कर्ता म्हणून महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या उभारणीत त्यांचे महत्वाचे योगदान होते. यशवंतरावांनी बदलत्या काळाशी सुसंवादी शासन यंत्रणा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. निर्णय व कृती परिस्थिती सापेक्ष असली पाहीजे तेव्हाच निरंतर विकास होतो. ही यशवंतरावांची भूमिका होती. त्यांच्या विचारांना आधुनिकतेची जोड होती. संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची कारकीर्द यशस्वी ठरली. संरक्षण विभाग व दले यांच्यात आमूलाग्र बदल करून तीनही दलातील सैन्यांना योजनेच्या माध्यमातून मदत व्हावी या करीता अनेक उपाययोजना केल्या. यशवंतरावांना राजकारणतली उद्दीष्टे महत्वाची वाटते. समाजाला न्याय मिळाला पाहिजे शेवटला घटक हा समाजाच्या मुख्य प्रवाहात आला पाहिजे यासाठी त्यांनी योजना अमलात आणल्या.

**प्रस्तावना**

संरक्षक दल हा देशाचा कणा आहे. भारतीय भूमीचे संरक्षण हे आपले आद्य कर्तव्य आहे ही समाज भावनेची संकल्पना व भूमिका यशवंतरावांची होती. संरक्षणमंत्री म्हणून पदभार घेतल्यावर त्यांनी भारतीय संरक्षण व्यवस्थेचा अभ्यास केला. सैन्य दलातील अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढविणे हे प्रथम उद्दिष्ट त्यांनी ठेवले. सैनिकांशी हितगूज करून त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण केला. संरक्षण दलातील अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका आयोजित करून सैन्यदलातील समस्या व प्रगती, सैन्याची अवस्था, संरक्षण व्यवस्थेतील अडचणी, परराष्ट्र धोरण, इतर देशांच्या सैन्यांची अवस्था, अंतर्गत कारभाराचे नियोजन अश्या अनेक विषयावर त्यांनी चर्चा घडवून आणून संरक्षण व्यवस्थेत नियोजन बध्दता आणली. सुरक्षा मंत्रालय व सैन्य दलाच्या मुख्य कचेरीत कामकाजाच्या बाबतीत त्यांनी शिस्तबध्दता आणली. सैन्यदलाची पुर्नरचना व पुन:सज्जता या बाबतीत सैन्यदलाने आखलेल्या योजनांमध्ये कधीच हस्तक्षेप केला नाही. उलट मार्गदर्शन केले तसेच इतर नागरी अधिकाऱ्यांनाही हस्तक्षेप करू दिला नाही. संरक्षण दलातील अनुभवी व तज्ञ मार्गदशकांच्या कार्याचा अनुभव त्यांना महत्वाचा वाटत होता युध्दनितीतील जुन्या संकल्पना दूर करून नवीन संकल्पना नवीन शस्त्रे व नवीन संघटन कौशल्य व निती यावर यशवंतरावांनी भर दिला. नव्या डोंगरी तुकडया उभ्या करून सैनिकांच्या हाती नवी शस्त्रास्त्रे व अन्य साधनसामुग्री उपलब्ध करून दिली. देशाच्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्यासाठी जास्तीत जास्त रक्कम प्राप्त व्हावी यासाठी प्रयत्न केले. त्यांनी नौदल, हवाईदल व लष्कर यांची साधनसामुग्री अद्यावत केली. देशाची संरक्षण व्यवस्था मजबूत होण्याच्या दृष्टीने त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले.

**संरक्षण मंत्री यशवंतराव यांच्या कार्याचे व भूमिकांचे विश्लेषण:**

यशवंतराव चव्हाण यांच्यावर देशाच्या संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी दिली गेली त्यांनी अत्यंत जबाबदारीने आपली भूमिका पार पाडून देशाच्या संरक्षण व्यवस्थेत अत्यंत महत्वाचे योगदान दिले. त्यांनी संरक्षण विभागात आमूलाग्र बदल घडवून आणला. संरक्षण खात्यात नियोजन व शिस्तबध्दता निर्माण करण्यात ते यशस्वी झाले. कोणत्याही जबाबदारीची भूमिका वठविण्याआधी यशवंतराव त्या व्यवस्थेचा अभ्यास करीत असत. संरक्षण मंत्री या नव्या कारकिर्दीची सुरूवात करताना प्रथम नेफा आणि लडाखच्या रणभूमीला त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून तिथल्या युध्दोत्तर परिस्थितीचा अभ्यास केला. काश्मीर व राजस्थानच्या सरहद्दीला त्यांनी भेट दिली. जवानांच्या प्रशिक्षण केंद्रात भेट देवून त्यांच्याशी सुसंवाद साधला. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. देशाचे संरक्षण धोरण हे केवळ लष्करी हालचालीचा विचार करणारे मर्यादित नसते तर देशाचे राजकारण व अर्थकारण त्यांच्याशी संबंधीत असते असा विचार मांडला. संरक्षणाची जबाबदारी जनतेमध्ये निर्माण व्हावी त्यांच्या मनात देशाच्या संरक्षणाचा विचार व्हावा असे यशवंतरावांना वाटत होते. संरक्षण खात्याची पाच हजार कोटी रूपये खर्चाची पंचवार्षीक योजना यशवंतरावांनी २३ मार्च १९६४ रोजी लोकसभेत ठेवली. या पंचवार्षिक योजनेत आधूनिक शस्त्रास्त्रांनी संरक्षण दल सुसज्ज करणे, ४५ स्कॉड्रन हवाईदल उभारणे, अत्याधूनिक जहाजांची खरेदी, पाणबुडयांचा संग्रह, सरहद्दीकडे नेणाऱ्या रस्त्यांचा विकास व दळणवळणाच्या सोयीमध्ये सुधारणा व वाढ, जवानांचे प्रशिक्षण, शस्त्रास्त्राच्या उत्पादनात आवश्यक वाढ तसेच संरक्षणासाठी निश्चित केलेल्या रकमेचा विनियोग सुनियंत्रीत करणे इत्यादी महत्वाच्या गोष्टींची तरतूद होती.

देशाची संरक्षणव्यवस्था मजबूत व्हावी यासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये अमेरिका, रशिया व इंग्लंड या देशांना भेटी दिल्या. अमेरीका व इंग्लंड या देशाच्या दुटप्पी धोरणांचा विरोध केला. पाकिस्तानाकडून येणाऱ्या चितावणीखोर कारवायांना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली भारताच्या संरक्षण विभागाने प्रगती केली. त्यामूळेच १९६५ साली पाकिस्तान सैन्यावर मात केली. यशवंतरावांच्या मते भारत हे बलशाली राष्ट्र बनले पाहीजे. आपला देश व संरक्षण दल स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर असले पाहीजे या भूमिकेचे

यशवंतरावांनी सदैव समर्थन केले. परदेशी विमानाच्या सहाय्याने संरक्षण व्यवस्थेचे कार्य करणे अडचणीचे आहे हे लक्षात आल्यावर विमानांचे व त्यांच्या सुटया भागाचे उत्पादन याच देशात व्हायला हवे यावर यशवंतरावांचे ठाम मत होते. त्यामूळे मिग २१ ही विमाने तयार करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. १९७१ ते १९७३ या काळात नौदलापयोगी अशा छोटया नौकांचे उत्पादन सुरू झाले. ०२ सप्टेंबर १९६३ ला यशवंत चव्हानांनी लोकसभेत एक निवेदन केले त्यानूसार त्यांनी संसदेत स्पष्टपणे सांगीतले की, “सैन्यातील अधिकारी आणि जवान यांच्यातील संबंधांना एक नविन आयाम देण्यासाठी आदेश दिले गेले आहेत. आणि हे संबंध लोकशाही परंपरांना सुसंगत असेच राखण्यात येतील व नेतृत्व गुणांच्या कसोटीवरच पदोन्नती दिली जाईल” या यशवंतरावांच्या निवेदनांवर लोकसभेत संतप्त चर्चा झाली यावेळी संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांनी आपली बाजू समर्थपणे मांडली.

१९६६ व १९६८ या दोन वर्षात अनेक आव्हानांना यशवंतरावांनी यशस्वीपणे तोंड दिले. संरक्षण खात्याशी संबंधीत विविध प्रश्नाबाबत धोरण त्यांनी कार्यान्वीत केले. जनसामान्यामध्ये लष्कराच्या भूमिकेसंबंधी जाणीव वाढविण्याचे प्रयत्न केले. यशवंतरावांच्या प्रशासकिय पूर्वानूभव व कार्यक्षमतेमूळे देश सुरक्षीत ठेवण्यास त्यांचे नेतृत्व उपयुक्त ठरले. भारताचे राजकीय स्थैर्य लोकशाही राज्यघटनेचे व्यवहारीक प्रशासन, केंद्र व राज्यसंबंध या सोबतच देशाची संरक्षण व्यवस्था आणि देशाचे परराष्ट्र धोरण या संबंधीची त्यांची भूमिका दूरदर्शी होती म्हणून यशस्वी संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची भूमिका महत्वाची वाटते.

**समारोपः**

**देशाच्या संरक्षण खात्याचे नेतृत्व 1962 ते 1966 पर्यंत करताना यशवंतरावांनी आधूनिकतेने युक्त असलेल्या भक्कम लष्कराची पायाभरणी केली त्यासाठी त्यांनी घेतलेल्या अपार कष्टाची व परिश्रमाची तूलना कशाचीच करता येणार नाही. यशवंतरावांची दूरदृष्टी व आधूनिक लष्करी सिध्दतेनूसारच 1965 च्या भारत–पाक युध्दात पाकिस्तानचा पराभव होवू शकला हे वास्तव इतिहासाला नाकारता येत नाही. यशवंतराव चव्हानांनी संरक्षणमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा आणि भूमिकांचा अभ्यास केल्यास ते एक देशभक्त ध्येयनिष्ट, व्यवहारकुशल संरक्षणमंत्री होते हे स्पष्ट होते. यशवंतरावांनी संरक्षणमंत्री म्हणून केलेली कार्ये देशनिष्ठा, देशाविषयीची तळमळ व त्यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीस तोड नाही. भारतीय लष्कराच्या आधूनिकतेसाठी व गूणवत्तावाढीसाठी तातडीची उपाययोजना म्हणून त्यांनी चार सुत्री कार्यक्रम संसदेसमोर ठेवला. यामध्ये लष्कराचे विस्तारीकरण, हवाईदलाचे आधूनिकीरण व विस्तार, तिसरे सुत्र सुरक्षा खात्याअंतर्गत संरक्षण उत्पादनाचा भक्कम विस्तार करणे होय. 1965 च्या भारत –पाक युध्दाने यशवंतरावांना एक किर्तीवलय दिले. उत्कृष्ट प्रशासक, कमालीचे युध्द नेतृत्व व पेच प्रसंगातून मार्ग काढणारे कार्यक्षम नेता म्हणून स्वतंत्र भारताच्या इतिहासात त्यांना स्थान मिळविले आहे.**

➢ *संदर्भग्रंथ*


*१. डॉ. अलका देशमुख यशवंतराव चव्हाण संरक्षण व विश्व पब्लिशर्स परराष्ट्र विषयक धोरण नागपूर २०१३*

*२. तळवलकर गोविंद यशवंतराव चव्हाण मौज प्रकाशन गृहव्यक्ती व कतृत्व गिरीगाव २०१२*

*३. चव्हाण यशवंतराव सह्याद्रिचे वारे प्रसिध्दी विभाग मुंबई १९६२*

*४. पवार प्रकाश यशवंतराव चव्हाणांचे समाज प्रबोधन पत्रिका अधिमान्यतेचे राजकारण जाने-मार्च २०१३*

*५. विश्वास नाईकनवरे महाराट्रभुाण गंधर्व वैद प्रकाशन यशवंतराव चव्हाण नोव्हेंबर २०१०*